॥ श्री ॥

आजीने नातवाला घातलेली भिक्षावळ

ॐ भवति भिक्षां देहि।

हे बटू! वैचारिक परिपक्वता असलेल्या शब्दधनाची भिक्षावळ ही आजी तुला घालतेय.

हे बटू! जगन्नियंत्या ईश्वराला तू विसरू नकोस. नित्य त्याची आठवण ठेव.

हे बटू! भावना! ईश्वरभक्ती, माणुसकी अन् प्रेम या तीन पावलांनी तुझे संपूर्ण जीवन व्यापले जाऊ दे.

हे बटू! दूरवरचे ठिकाण जवळ करण्यासाठी तू विमान, आगगाडी, कार अशा साधनांचा उपयोग करशील तसे माणसांची मने जवळ करण्यासाठी तू गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध इ. ग्रंथांच्या संगतीत असावेस.

हे बटू! केवळ पैशाच्या मागे लागून घरांची उंची वाढविण्यापेक्षा मनाच्या मोठेपणाची उंची वाढविणारे तुझे वर्तन असावे!

हे बटू! शिक्षणाने तुझ्या पंखात जरी विदेश भ्रमणाचे बळ आले तरी देशाचे ऋण कधी विसरू नकोस. ते काही अंशाने फेडण्यासाठी तरी तू आपल्या देशात असावेस.

हे बटू! शिक्षणाइतकेच संस्कारालाही आयुष्यात महत्वाचे स्थान आहे. हे लक्षात ठेव.

हे बटू! आई वडील हे आपले आयुष्यातील पहिले गुरु आहेत हे तू कधीच विसरू नकोस. त्यांना तू कधीच अंतर देऊ नकोस.

हे बटू! जीवनात कोणतीही गोष्ट साधण्यासाठी उत्तम आरोग्य असावे लागते. ते योग आणि व्यायाम यांच्या साहाय्याने तू मिळवावेस.

हे बटू! जीवन खऱ्या अर्थाने समाधानी होण्यासाठी तू ईश्वराजवळ संयमाची भिक्षा मागावीस.

शुभं भवतु!

सौ. अपर्णा गोरवले.

